नियमित दिवाणी दावा क्र. २३/२०१३
निशाण क्र. ७९ लगत

**वादींतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ स्वतः वादी क्रमांक ०३ जयवंत गणपत शेडगे यांचा पुढील उलटतपास शपथेवर, प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांचेकडून** –

**४९.** हे म्हणणे खरे आहे की, आमची खानावळ व प्रतिवादी यांच्या ताब्यात असलेला गाळा एकाच इमारतीत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ती खानावळ ज्या भागात आहे त्या भागास व प्रतिवादीच्या गाळयास एकच सामाईक आडे होते. हे म्हणणे खरे आहे की, ते आडे कापून आम्ही आमच्या ताब्यातील भागाच्या केवळ छपराची दुरुस्ती केली. हे म्हणणे खरे आहे की, त्याच इमारतीतील एक गाळा हेमंत भिकदेव नार्वेकर यांना भाडयाने दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, हेमंत नार्वेकर तेथे सराफ व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने केलेल्या आदेशाला अनुसरुन हेमंत नार्वेकर यांनी त्यांच्या ताब्यातील भागाची दुरुस्ती केली, साक्षीदार सांगतो की, न्यायालयाने तो तुर्तातुर्त आदेश केला होता. त्या तुर्तातुर्त आदेशाविरुध्द आम्ही अपील दाखल केले नाही.

**५०.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने जमा केलेली रक्कम मिळावी यासाठी आम्ही अर्ज केला आहे तो अर्ज मंजूर झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीकडे भाडयाने असलेल्या गाळयाची दुरुस्ती २०१३ सालापासून आम्ही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या ताब्यात असलेल्या व आमच्या म्हणण्याप्रमाणे मोडकळीस आलेल्या गाळयाबाबत २०१३ सालापासून आजपर्यंत कोणतीही दुर्देवी घटना अथवा अनुचीत प्रकार घडला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या ताब्यातील गाळयाच्या छपरावर प्लॅस्टीक आवरण टाकून ते गळणार नाही यासाठी प्रतिवादी दरवर्षी प्रयत्न करतात. कोणताही अनुचीत प्रकार २०१३ सालापासून प्रतिवादीच्या गाळयात किंवा आसपासच्या भागातही घडलेला नाही, याबाबत मला सांगता येत नाही. २०१३ पूर्वीही व अजूनपर्यंत आमच्या ताब्यात असलेल्या भागात आम्ही वास्तव्य करतो.

**५१**. मला आता दाखविण्यात आलेल्या दस्तऐवजांची यादी निशाणी ११० मधील अनुक्रमांक ०७ ते १९ कडील पावत्यांवर माझे काका मारुती सोनू शेडगे यांनी सहया केलेल्या आहेत, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, त्याबाबत मला सांगता येत नाही. त्या पावत्या माझे काका मारुती सोनू शेडगे यांनी दिल्यामुळेच प्रतिवादींकडे आल्या असे काही मला माहित नाही. माझे काका मारुती शेडगे हे प्रतिवादींकडून विक्रम संवत वर्षाप्रमाणे वार्षीक स्वरुपात भाडे घेत होते असे काही मला माहित नाही.

**५२**. हे म्हणणे खरे नाही की, त्या इमारतीत चार गाळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या इमारतीतील एक गाळा आमच्या ताब्यात, एक गाळा हेमंत नार्वेकर यांच्या ताब्यात व दोन गाळे प्रतिवादींच्या ताब्यात आहेत. प्रतिवादींच्या ताब्यातील गाळयांना गाळा क्र. ०३ व गाळा क्र. ०४ असे उल्लेखले जायचे, याबाबत मला काही सांगता येत नाही. प्रतिवादींना दोन गाळे भाडयाने देण्यात आले होते असे काही मला माहित नाही. दोन गाळे प्रतिवादींना भाडयाने देण्यात आल्याबाबत वादपत्रात व माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात का नमूद आहे याबाबत मला सांगता येत नाही. मला वादपत्रातील व सरतपासातील मजकूर सांगता येत नाही.

**५३**. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने दरमहा ८००/– रुपये भाडे दयावे असे ठरल्याबाबत अथवा तितके भाडे प्रतिवादी देत होते याबाबत आमच्याकडे काही कागदोपत्री पुरावा नाही.

**५४**. प्रतिवादींना ती मिळकत भाडयाने किती साली दिली होती हे मला आठवत नाही. ती मिळकत प्रतिवादींकडे किती वर्षांपासून भाडयाने आहे हे मला सांगता येत नाही. प्रतिवादीकडे ती मिळकत भाडयाने दिल्यापासून त्या भागाची दुरुस्ती आजवर करावी लागलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी काही दुरुस्ती आज पर्यंत आम्ही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या ताब्यातील गाळयाची दुरुस्ती करुन घेण्यासाठी प्रतिवादी आम्हाला वेळोवेळी सांगत होते. हे म्हणणे खरे नाही की, तरी सुध्दा आम्ही दुरुस्ती न केल्यामुळे प्रतिवादींनी त्यांच्या ताब्यातील गाळयाची

दुरुस्ती स्वतः करुन घेतली. आम्ही दुरुस्ती न केल्यामुळे तशी दुरुस्ती प्रतिवादींनी स्वतः करुन घेतली याबाबत प्रतिवादींनी नोंदणीकृत डाकेने माझे काका मारुती शेडगे व काकी निर्मला शेडगे यांना कळविले असे काही मला माहित नाही. सन २००२ च्या दरम्यान प्रतिवादींनी त्यांच्या ताब्यातील गाळयाच्या दुरुस्तीसाठी रक्कम रुपये १६,९४८/– खर्च केली होती, याबाबत मला काही सांगता येत नाही. ती रक्कम भाडयातून वजावट करुन घेण्याचा त्यांना हक्क आहे, असे काही मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादींना रक्कम रुपये १,९०,०००/– देण्यास जबाबदार आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटाच दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.01.29 13:55:30 +0530

**(ब. द. तारे)**

दि.२९/०१/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 29/01/2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 29/01/2025 |
| Order uploaded on | : | 29/01/2025 |